PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 1

# जयप्रकाश नारायण यांचे सर्वोदयी विषयी विचार

**डॉ संभाजी संतोष पाटील**
श्री.शि.वि.प्र.संस्थेचे महाविद्यालय,
शिंदखेडा, जि.धुळे
**[महाराष्ट्र] भारत**

## प्रस्तावना :

स्वातंत्र्योत्तर गांधी मार्गाचा अविष्कार आपणास सर्वोदयात दिसून येतो. जयप्रकाश नारायण आणि विनोबा भावे यांनी भारतात या विचारांचा प्रसार व प्रचार करण्याचे महान कार्य केल्याचे दिसून येते. सर्वोदयवाद्यांची गांधी विचारसरणीवर श्रध्दा व निष्ठा होती. महात्मा गांधीजींनी सांगितलेले रचनात्मक विचार व गांधी तत्वज्ञानातील विधायक कार्य सुरू ठेवणे हे या समाजाचे ध्येय होते. पहिले तत्वनिष्ठ सत्याग्रही म्हणून ओळखले जाणारे आचार्य विनोबा भावे यांनी 1948 साली सर्वोदय समाजाची स्थापना केली. महात्मा गांधी व विनोबाजी यांच्या मार्गानेच जयप्रकाशजींनी 'संपूर्ण क्रांतीचा ' प्रयोग सांगितला आणि सर्वोदयाद्वारा पक्षविरहीत लोकशाही स्थापनेसाठी आग्रह धरला. त्यांचे योगदान फार मोठया प्रमाणात दिसून येते. जयप्रकाश नारायण यांनी मानवी स्वातंत्र्यास स्थायी मूल्य मानले होते. त्यांचा संपूर्ण वैचारिक प्रवास या मुल्य शोधणेसाठी झाला. काळाच्या ओघात त्यांची स्वातंत्र्याची संकल्पना अधिकाधिक व्यापक व सुक्ष्म बनत गेली तसेच स्वातंत्र्याच्या प्राप्तीची साधनेही बदलत गेलेली दिसून येतात. साम्यवादाकडुन समाजवादाकडे आणि समाजवादाकडून सर्वोदयाकडे त्यांना नेणारी प्रेरणा म्हणजेच मानवमुक्ती होय. त्यांनी केवळ देशाच्या संदर्भात स्वातंत्र्याचा विचार केला नाही तर अखील मानव जातींना बंधनमुक्त करण्यासाठी त्यांना फार मोठे व्यापक कार्य हाती घेतले होते.

**संशोधनाची उद्‌दिष्टये :**

(1) जयप्रकाश नारायण यांच्या कार्याचा आढावा घेणे.

(2) जयप्रकाश नारायण यांनी समाजाच्या प्रगतीसाठी केलेल्या कार्याची माहीती करून घेणे.

(3) जयप्रकाश नारायण यांचे सर्वोदयी विचार जाणून घेणे.

(4) जयप्रकाश नारायण यांनी समाजाच्या प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती करून घेणे.

**संशोधन पध्दती :–**

सामाजिक शास्त्रात व्यक्ती विषयक संशोधन करतांना ती व्यक्ती ज्या कालखंडात होऊन गेली त्या काळातील त्या व्यक्तीविषयीचे लिखाण संदर्भ म्हणून तपासावे लागते. यासाठी ऐतिहासिक दस्तऐवज, नोंदी तपासणे उपयोगाचे असते. त्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब करावा लागतो. जयप्रकाश नारायण यांचे सर्वोदयी विषयी विचार अभ्यासतांना स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील नोंदी, इतरांनी त्यांच्याविषयी नोंदविलेली मते, विचार, घडलेल्या घडामोडी याची माहिती ऐतिहासिक साधंनाद्वारे प्राप्त केली आहे. नेत्यांविषयीचे संशोधन करतांना त्या नेत्याने लिहीलेली रोजनिशी, पत्रव्यवहार, लेख, ग्रंथ त्याचबरोबर त्यांच्याविषयी तत्कालीन नेत्यांनी मांडलेले विचार आणि त्यांच्याबाबत नंतरच्या कालखंडात लिहीलेले ग्रंथ यांची माहिती ग्रंथालय पध्दतीचा अवलंब करून संकलीत करण्यात आली आहे.

**विषयाचे महत्व :**

जयप्रकाश नारायण हे थोर स्वातंत्र्य सेनानी व महापुरूष होते. कोणत्याही राजकीय सत्तेच्या पदाला थारा न देता एक ऋषीतुल्य राजकीय विचारक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. महात्मा गांधीजींच्या सहवासात राहून देखील त्यांनी स्वतंत्र भूमिका पार पाडलेली आहे. त्यांनी प्रत्यक्ष स्वातंत्र्य संग्रामात घेतलेली भूमिका नंतर झालेला तुरूंगवास, स्वातंत्र्यानंतर काँग्रेसला सोडचिठ्ठी, समाजवादाची पाठराखण आणि सर्वोदयी विचारांचा स्विकार त्यांनी केला. भारतीय लोकशाही वृध्दींगत व्हावी म्हणून मांडलेले विचार हे भारतीय इतिहासाचा आणि भारतीय विचारधनाचा अभ्यास करणाऱ्यांना उपयुक्त ठरणारे आहे. त्यांचे

विचार फारच मोलाचे व उपयुक्त आहेत. याच दृष्टीकोनातून जयप्रकाश नारायण यांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**सर्वोदयाची व्याख्या** :

(1) महात्मा गांधी यांच्या मते "अहिंसक मार्गाने सर्वांचे कल्याण साधणारी चळवळ" म्हणजे सर्वोदय होय".

(2) विनोबा भावे "जातीय भेदभाव, पिळवणूक यांना थारा नसलेला तसेच विकास साधणारा आणि सत्य, अहिंसा व साधनसूचिता यांच्या पायावर उभा नसलेला नवा समाज म्हणजे सर्वोदय होय."

सर्वोदयात संपूर्ण समाज हिताचा विचार अभिप्रेत आहे. त्यात सर्वांचा विकास साधणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. सर्वोदयात संघर्ष, विषमता शोषणरहित समाजाची तसेच त्या समाजातील खालच्या पातळीवरील व्यक्तीला विकासाची समान संधी उपलब्ध करून देणारी व सर्वांचे कल्याण साधणारी समाजरचना म्हणजे सर्वोदय होय. सर्वोदयाच्या विचारात समाजाचे संपूर्ण कल्याण साधण्यासाठी आर्थिक, भौतिक व आध्यात्मिक साधनांवर भर दिला आहे. "सर्वोदयाचा अर्थ सर्वांचे कल्याण, सर्वांची सेवा गांधीप्रणित समाजवाद, सहकारी समाज असाही लावला जातो." जॉन रस्कीनच्या 'अन टू दिस लास्ट' या ग्रथांतील तीन प्रमुख विचार म्हणजे (1) सर्वाच्या कल्याणमध्ये व्यक्तीचे कल्याण समाविष्ट झालेले असते. (2) वकीलांचे कार्य आणि न्हाव्याचे कार्य हयांचे मूल्य सारखेच असते कारण त्या दोघांना काम करूनच आपली उपजीविका करण्याचा हक्क असतो. (3) श्रमीकांचे जीवन, हस्त व्यवसाय करणाऱ्यांचे जीवन जगण्यालायक असते. सर्वोदयी विचारसरणी अशा विचारावरच आधारलेली नसून ती महात्मा गांधींनी सुरूवातीस मांडली आणि त्या विचारसरणीचा विस्तार त्यांचे अनुयायी आचार्य विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांनी केलेला दिसून येतो"[1]. सर्वोदयामध्ये समाजातील सर्वच लोकांचे कल्याण अभिप्रेत असून जेरेमी बेथॅमच्या बहुजनांचे कल्याण या संकल्पनेपेक्षा व्यापक आहे. सर्वोदय ही विचारप्रणाली भारतीय जीवन पध्दतीचा मूळ परंपरेवर आधारलेली आहे. फक्त भौतिक सुखामूळे व्यक्तीला सुख प्राप्त होत नाही तर त्यास सुखप्राप्तीसाठी अध्यात्मिक सूख मिळणे गरजेचे आहे. "महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानातुन निर्माण झालेला सिध्दांत, सर्वांच्या अभ्युदयाचा पुरस्कार करणारा, व्यक्तीची स्वायत्ता महत्वाची मानणारा, आर्थिक व सामाजिक समतेवर आधारलेल्या शासनमुक्त समाजाचा आग्रह धरणारा सिध्दांत विनोबा व जयप्रकाश यांनी या सिध्दांताचा विकास केला. "[2]

"समाजाला उपलब्ध असलेल्या भौतिक, आर्थिक व अध्यात्मिक साधनांचा सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने अधिकाधिक उपयोग करून घेण्याचे सर्वोदय हे एक शास्त्र आहे. अधिकाधिकांचे अधिकाअधिक सुख या उपयुक्त वाद्यांच्या मुळ सुत्रापेक्षा सर्वोदय उद्दिष्ट अधिक व्यापक आहे. समाजातील प्रत्येकाचे व सर्वांचे कल्याण अभिप्रेत आहे."[3]

**सर्वोदयी विषयी विचार** :

सर्वोदय वादाला राज्यविरहीत, वर्गविरहीत असा समाज निर्माण करावयाचा आहे की, ज्या समाजात कोणीही शोषण करणार नाही. तेथे प्रत्येकाला स्वातंत्र्य असेल त्या समाजात समता व बंधुभाव असेल. सर्वोदयात 'समानता' हे साध्य आहे तर विकेंद्रीकरण हे साधन आहे. विकेंद्रीकरणाच्या सहाय्याने अहिंसात्मक मार्गाने तसेच वर्ग समन्वयाची भावना निर्माण करून सामाजिक आणि आर्थिक समानता साधता येवू शकेल असा सर्वोदयी वा्द्यांचा विश्वास आहे. मुख्यप्रवाह सोडून जयप्रकाश नारायण राष्ट्रीय जीवनाचा मुख्य प्रवाह सोडून सर्वोदयाच्या 'विजनारण्यात' म्हणजे कोपऱ्यात जाऊन बसले अशी त्यांच्यावर टिका करण्यात आली. तर काही लोकांनी असे म्हटले की, सत्तास्थान प्राप्त करण्याच्या शर्यतीत जयप्रकाश नारायण हे नेहमी चुकीच्या घोडयावर बसले आहेत. काहींनी अशीही टिका केली की, जयप्रकाशजींची बस नेहमी चुकत असते. टिकाकारांनी त्यांनी सांगितले की, " माझ्या राजकारण निवृत्तीचा अर्थ लोकांच्या ध्यानात येईल असे मला वाटते हा काही माझा नकारात्मक निर्णय नव्हता. राजकारणातल्या गढुळ, अनैतिक वातावरणाचाच उबग आल्यामुळे मी राजकारणातुन निवृत्त झालो हे खरे नाही. सर्वोदयाच्या लोकनितीविषयक विचाराने मला आकर्षून घेतल्यामुळे मी राजकारणापासुन दूर झालो. सत्तेच्या राजकारणाशी लोकनितीचा काही संबंध नाही. सत्तेची सारी केंद्रच नाहीशी व्हावीत असा लोकनितीचा प्रयत्न राहील. जसजशी लोकनिति यशस्वी सफल होते तसतशी राजनिति मर्यादीत होत जाईल. संकोच पावत जाईल अशी अशा तऱ्हेनेच शेवटी राजसत्तेंच विलयन ही मार्क्सची कल्पना साकार होईल"[4] लोकनिति व राजनिति हे आचार्य विनोबा भावे यांचे शब्द आहेत. सत्ताप्राप्तीसाठी राजकीय पक्ष जी धडपड करीत असतात तिला त्यांनी राजनीती असे म्हटलेले आहे व सार्वजनिक सेवेच्या केवळ निस्वार्थ बुध्दीने आणि स्वराज्याचा पाठ लोकांना शिकविण्यासाठी जे राजकीय कार्य लागते त्यास लोकनिति असे विनोबांनी म्हटलेले आहे.

जयप्रकाश नारायण यांना मार्क्सवादाचे आकर्षण वाटत होते त्याचे कारण हे होते की, भारताच्या स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधी यांनी दाखविलेल्या मार्गापेक्षा मार्क्सप्रणीत क्रांतीचा मार्ग अधिक निश्चित आणि शीघ्रगामी ठरेल असे त्यांना वाटत होते. लेनीनच्या यशाने भारावल्यामुळे क्रांतीचा मार्क्सवादी मार्ग क्रांतीचे सर्वोकृष्ट व आदर्श उदाहरण आहे. असा

त्यांना विश्वास वाटत होता. समता आणि बंधुत्वाची ज्योत मार्क्सवादानेच चेतवली आहे. उपासमारी द्रारिद्रय, शोषण यापासुन स्वातंत्र्य मिळाले नाही, तर केवळ परकीय सत्तेपासुन मिळालेल्या स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही याची जाणिव त्यांना मार्क्सवादाने दिलेली आहे. समाजवाद म्हणजे केवळ भांडवलशाहीचा अभाव नाही. कदाचित भांडवलदारी नष्ट होईल. शेती, व्यापार, उद्योगधंदे, बँका इत्यादीचे राष्ट्रीयकरण होईल. तरीही समाजवाद खूप दुरच राहू शकतो. कधी कधी उद्दिष्टांच्या अगदी विसंगत असे काहीतरी घडू शकते असे त्यांना वाटू लागले. शोषणाचा अभाव हे समता आणि सामाजिक न्यायाचे खरे समाजवादाचे निकष आहेत असे जयप्रकाश नारायण यांना वाटत होते आणि या गोष्टी सोव्हीयत रशियामध्ये अभाव आहे अशी त्यांची समजुत झाल्याने तेथील व्यवस्थेवर त्यांचा विश्वास उडत गेला. तेथे राजकीय व आर्थिक सत्तेचे पुर्णपणे केंद्रीकरण झाले आहे असे त्यांचे मत बनले. जयप्रकाश नारायण आपल्या मित्रांना पत्र लिहितात आणि त्यात ते म्हणतात" ... " केवळ भांडवलशाही नष्ट करून समाजवादाची स्थापना होत नाही हे रशियाच्या प्रयोगावरून मला कळून चुकले... .. या गोष्टीवर जेव्हा मी अधिकाधिक विचार करू लागलो तेव्हा विकेंद्रीकरण आणि राज्यसत्तेचा क्षय या कल्पनांकडे माझे लक्ष जाऊ लागले. मनुष्या मनुष्यातले परस्पर संबंध आणि त्यावर सामाजिक नियंत्रण कसे असावे याबाबतीतले पर्याय मी शोधु लागलो"[5]

सर्वोदय विचार संपुर्ण देशभर पसरविण्याच्या दृष्टीने जयप्रकाशजींचा सर्वोदय आंदोलनाशी आलेला हा निकटचा संबंध आंदोलनाला लाभदायी ठरला. 1956 मध्ये मुंबईत आशियातल्या समाजवाद्यांची एक परिषद भरली होती. युरोपातील समाजवादी प्रतिनिधी या परिषदेला मोठया प्रमाणात उपस्थित होते. त्यांच्यासमोर भाषण करतांना जयप्रकाश नारायण यांनी स्वतःला अभिप्रेत असलेला समाजवादाचा अर्थ प्रतिपादन केला होता. त्यांनी मित्रांच्या निमंत्रणावरून 1958 मध्ये युरोप व इतर देशांचा दौरा केला होता समाजवादी, बुध्दीजीवी, शांततावादी व विचारवंत लोकांच्या संस्थांना त्यांनी भेटी दिल्यात. समाजवाद, हुकूमशाही, साम्यवाद, लोकशाही, हिंसा–अहिंसा, साधन संपत्ती, विश्वशांती, अण्वस्त्रे, क्रांतीचा खरा अर्थ आणि सर्वोदय विषयासंबंधीचे विचार त्यांच्या भाषणातून येत असत. ते भूदान व ग्रामदानावरही बोलत असत. भारतासह सर्व जगालाच सर्वोदय विचारप्रणाली तारक ठरणार आहे. सर्वोदयाचा स्विकार केल्यानंतर जयप्रकाश नारायण यांनी म्हटले आहे की, "माझी अशी दृढ श्रध्दा आहे की, जगात प्रचलीत असलेल्या सर्व सामाजिक तत्वज्ञानापेक्षा सर्वोदय विचार हा अधिक प्रगत विचार आहे. जगात शांतता स्वातंत्र्य व बंधुभाव नांदायचा असेल तर साम्राज्यवादाला शेवटी सर्वोदयातच विलीन व्हावे लागेल. स्वतंत्र भारताच्या घटनेनुसार देशात सार्वत्रिक निवडणुका झाल्या, तेव्हापासुन जयप्रकाशजी पक्षीस राजकारणापासुन निवृत्त होऊन हळूहळू सर्वोदयाकडे वळू लागले"[6].

महात्मा गांधी यांची 1948 मध्ये नथुराम गोडसे या माथेफिरूने हत्या केली. या हिंसक घटनेचा जयप्रकाश नारायण यांना फारच धक्का बसला. साधनसूचीतेचा आग्रह किती अर्थपूर्ण होता हे त्यांना जाणवले म्हणून ते सर्वोदयाकडे आकर्षित झाले. 23 जुन 1952 मध्ये त्यांनी 21 दिवसाचा उपवास केला. या काळात त्यांनी चिंतन केले त्यामुळे सैध्दांतिक दृष्टीने त्यांची जीवननिष्ठा मजबुत बनली व अध्यात्मिक पातळीवरचा आत्मप्रत्यय त्यांनी अनुभवला. ते 1922 ते 1934 पर्यंत साम्यवादी होते. 1934 ते 1954 पासुन त्यांनी सर्वोदय विचार सरणीचा स्विकार केला. देशातील स्वार्थ पक्षीय राजकारणामुळे राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन दूषीत बनला आहे. प्रत्येक राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते हे केवळ स्वार्थ, सत्ता आणि प्रतिष्ठा या दृष्टीकोनातून राजकारणाकडे पाहतात असे वाटल्यानंतर जयप्रकाश नारायण यांनी पक्षीय राजकारणाचा त्याग करून सर्वोदयाचा स्विकार केला. जयप्रकाश नारायण यांना साध्य साधनांच्या शुचित्याचे महत्व वाटू लागले मार्क्सवादास साध्य चांगले असल्यास साधने कशीही असली तरी चालणार होते त्यांना हे पटले की, वाईट साधनांचा अवलंब करून उत्तम साध्ये कधीच संपादीत करता येणार नाही म्हणूनच मार्क्सच्या क्रांतिकारक नीतिकल्पनेचा त्याग करून नवीन वाट शोधण्यास ते प्रवृत्त झाले. “सर्वोदयाचेच तत्वज्ञान केवळ भारताला उपयोगी पडणारे नसून तो जागतिक स्वरूपाचा विचार जयप्रकाशजींनी मांडला. लोकशाही, समाजवाद, कम्युनिझम नागरिक स्वातंत्र्ये, हिंसाचार अहिंसा, अणूशास्त्राचा धोका, जागतिक शांततेचा प्रश्न इत्यादी विविध विषयांचा त्यांनी आपल्या दौऱ्यात परामर्श घेतला व त्या संदर्भात सर्वोदयी तत्वज्ञानाचे जागतिक महत्व प्रतिपादन केले.”[7] विनोबांनी 1951 मध्ये भूदान आंदोलनास सुरूवात केली. या आंदोलनाने फार काही साध्य होईल असे जयप्रकाश नारायण यांना वाटत नव्हते. स्वेच्छेने दान होऊन जमिनीचे फेरवाटप करण्यास शेकडो वर्ष लागतील व जमिनदार निस्वार्थी भावनेने आपल्या जमीनीचा काही भाग दान म्हणून देणार नाहीत त्यावेळी जयप्रकाशजी असा विचार करत असत की, समाजवादी सरकार आहे तर ते कायदे बनवून श्रीमंतांकडून त्यांची संपत्ती काढून घेतील. परंतु विनोबा भावेंच्या भूदान चळवळीस जमीनदारांनी उत्स्फुर्त पाठींबा दिला. अनेक लोकांनी जमीन दान करण्याची इच्छा व्यक्त केली. गावातील जमीन व्यक्तीगत संपत्ती न राहता सर्व ग्राम समाजाची सामुदायित संपत्ती झाली आचार्य विनोबा भावेंनी त्यास ग्रामदान हे नांव दिले व याचा प्रभाव जयप्रकाशजींवर पडला आणि भूदान, ग्रामदान, ग्रामस्वराज्य इत्यादी प्रकारच्या सर्वोदयाच्या कार्यात ते एकाग्र झाले त्यासाठी त्यांनी संपूर्ण देशभर दौरा केला. ग्रामदान मिळविण्याच्या कामात सर्वोदय कार्यकर्त्यांना मदत केली व ग्रामदानी गावांच्या विकासासाठी निधी गोळा केला व त्यामागची क्रांतिकारक विचारप्रणाली लोकांना, कार्यकर्त्यांना त्यांना आधुनिक परिभाषेत समजुन सांगितली. भूदान चळवळ जमिनीची पूर्नवाटणी करण्यासाठी सुरू करण्यात आलेली असली

तरी या प्रकारचा क्रांतिकारक बदल शांततेच्या मार्गाने घडवून आणावयाचा आहे. कायद्यापेक्षा भावनेला आवाहन करून व कर्तव्याची जाणिव निर्माण करून हे कार्य पूर्ण करावयाचे आहे असे जयप्रकाशजींनी सांगितले. जमिनीच्या मालकीचा प्रश्न लोकांचे मतपरिर्वन करून सोडवावयाचा आहे. नाहीतर जामिनदारांचे निर्मुलन कायद्याद्वारेही करता येऊ शकेल. पण सत्ता व कायद्याचा वापर केल्यास लोकांमध्ये त्यागाची भावना निर्माण होणार नाही कायद्याने जमीन काढून घेता आली तरी त्यामुळे जमीनीबाबतचा लोभ नष्ट होणार नाही. भूदानाच्या मार्गाने जमिनी दिल्या तरी हृदय परिवर्तन होत असते. त्यामागे प्रेमाची भावना असते. भूदानामुळे गरीब व श्रीमंत यांच्यातील वर्गसंघर्षाचा धोका नष्ट होऊन सहकार्य प्रस्थापित होण्यास मदत होऊ शकेल.

**मूल्यमापन** :

जयप्रकाश नारायण अमेरिकेत शिक्षण घेत असतांना त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव होता. परंतु भारतात परत आल्यानंतर गांधीजींच्या सान्नीध्यात आल्यानंतर ते महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रभावीत होतात. त्यांच्या साधनशुचीतेची कल्पना स्विकारून गांधीजींच्या सर्वोदय विचारांचा अंगीकार करतात. स्वातंत्र्य आंदोलनात सर्वोदयविषयी मांडलेला गांधीजींचा विचार प्रत्यक्ष साकार करण्यात आचार्य विनोबा भावे यांनी प्रयत्न केलेत. त्यासाठी त्यांनी भूदान चळवळ अंगीकारली. तोच मार्ग स्विकारून जयप्रकाश नारायण यांनी देखील भूदान चळवळीची धुरा सांभाळली. मानवी स्वातंत्र्यास स्थायी मानुन ते साम्यवादाकडुन लोकशाही समाजवादाकडे व लोकशाही समाजवादाकडुन सर्वोदय आणि निपक्षीय लोकशाहीबाबत विचार मांडून आपली भूमिका निश्चित करतात. त्यांच्या एकूण विचारांचा सार म्हणजे मानवमुक्ती होय. सर्वोदयाच्या मार्गानेच विश्वशांती स्थापन करता येईल ही त्यांची महत्वपुर्ण भूमिका होती. सर्वोदय हा केवळ व्यक्तीसोबत सर्वाच उदय निहीत असून त्यांनी त्याबाबत मांडलेला विचारांना विशालता प्राप्त करून देणारा आहे. सर्वोदय हा विचार नसून तो एक जीवनमार्ग आहे.

## संदर्भसूची :

1. गोखले आर.एम. – राजकीय विचारप्रणाली, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती 1978, पृष्ठ क्रमांक 74

2. व्होरा राजेंद्र – राज्यशास्त्र कोश, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे 30, प्रकाशित 1987, पृष्ठ क्रमांक 337

3. भोले भा.ल. – आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीशर्स, नागपुर द्वितीय आवृत्ती 2003 पृष्ठक्रमांक – 449

4. नारगोलर वसंत – संपूर्ण क्रांतीच्या दिशेने जयप्रकाशजी मॅजेस्टीक बुक स्टॉल, गिरगांव नाका, मुंबई 4, प्रथम आवृत्ती 1977, पृष्ठ क्रमांक 51

5. भोळे भा.ल. – उपरोक्त पृष्ठ क्रमांक 35.

6. नारगोलकर वसंत – उपरोक्त पृष्ठ क्रमांक 35

7. राजहंस बा.नं. – लोकनायक जयप्रकाश चरित्र व कार्य कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे – 30 द्वितीय आवृत्ती, 1978, पृष्ठ क्रमांक 141.